# ग्यानबा-तुकारामाच्या जयघोषाने श्रीपूर परिसर दुमदुमला

## तुकोबारायांचे श्रीपूर-महाळुंगमध्ये उत्साहात स्वागत; बोरगांव मुक्कामी पालखी सोहळा विसावला

**श्रीपूर** : टाळ मृदंगाचा गजर व ग्यानबा तुकारामचा जयघोष करत जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा व त्यांच्या समवेत असलेल्या लाखो वैष्णवांचे मेळा श्रीपूर नगरीमध्ये दाखल होत असताना अवघा परिसर दुमदुमला.

यावेळी कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक श्री पांडुरंग सहकारी साखर कारखान्याच्या वतीने व नागरिकांनी मोठ्या भक्तीभावाने उत्साहात स्वागत केले. यावेळी पांडुरंगचे संचालक दाजी पाटील, दिलीप चव्हाण, बाळासाहेब यलम ार, तानाजी वाघमोडे, भगवान चौघुले व अधिकारी यांनी कारखाना प्रवेशद्वारासमोर संत तुकाराम महाराज यांच्या पादुकाचे पूजन करून दर्शन घेतले. त्याचबरोबर ब्रिमासागर डिस्टलरी प्रवेशद्वारासमोर कारखान्याची मॅनेजिंग डायरेक्टर उदय कोठारी, बृहन्स उद्योगसमूहाचे मंदार आगाशे, डायरेक्टर, घैसास मान्यवर, भरतकुमार सेठीया, जनरल मॅनेजर दिनकर बेंबळकर, चंद्रकांत भागवत, नरेश पाठक व अधिकारी आदींनी पालखींचे स्वागत करून दर्शन घेतले. यावेळी पांडुरंग कारखाना व ब्रिमा सागरच्या वतीने हजारो वारकऱ्याना केळी, नाष्टा, चहा पाणी व फराळाचे वाटप करण्यात आले. त्यानंतर पालखींचा रथ शिवाजी चौक व डॉ. आंबेडकर चौकातून पुढे बोरगावकडे निघाला. सोहळ्यातील वारकऱ्यांना जागोजागी भोजन, नाष्टा, चहापानाची व्यवस्था करण्यात आली होती. याम ध्ये संत वाल्मीकि संघाकडून चहा वाटप, अल्लाहबक्ष शेख यांच्याकडून पाच हजार लिटर जारचे शुद्ध पाणी, जवाहिरे परिवाराच्यावतीने वारकऱ्यांना पाण्याची बॉटल वाटप करण्यात आले. मौला पठाण यांच्याकडून ३ हजार भाविकांना भोजन, त्याचबरोबर जागृती तरुण मंडळ, व्यापारी मंडळ, बेंद्रे परिवार, सत्यसाई तरुण मंडळ, तसेच विविध सामाजिक संघटनेच्या वतीने चहा, नाष्टा, भोजन केळी, फराळाचे वाटप केले. निमा संघटना यांच्या वतीने डॉ. हरिश्चंद्र सावंत पाटील यांच्या हॉस्पिटलमध्ये श्रीपूरमधील सर्व डॉक्टरांनी वारकऱ्यांची मोफत तपासणी करून औषधोपचार केले. प्रत्येक चौकाचौकात सार्वजनिक ठिकाणी प्रवचन, कीर्तन, भजन व भारुडांचे कार्यक्रम पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

यानंतर पालखी सोहळ्याने मुक्कामासाठी बोरगावकडे प्रस्थान केले. बोरगावच्या हद्दीत पालखीने प्रवेश करताच ग्राम पंचायतच्यावतीने तोफांची सलामी दिली. यावेळी सरपंच सारिका गोसावी, उपसरपंच मदनसिंह पाटील, सहकार महर्षि साखर कारखान्याचे माजी उपाध्यक्ष प्रकाशराव पाटील, भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष राजकुमार पाटील, माजी उपसभापती प्रतापराव पाटील, पोलिस पाटील मनीषा पाटील व सदस्य यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत करून पालखी विश्वस्त उमेश मोरे त्यांचा सर्व सहकाऱ्यांचा सत्कार केला. आरती झाल्यानंतर सर्व दिंड्यामधील वारकरी गावामधील शाळा, समाजमंदिर तसेच वाड्या वस्त्यावर सोय होईल अशा ठिकाणी मुक्कामाला गेले.



श्रीपूर : येथे तुकाराम महाराज पालखी आल्यानंतर ग्रामस्थांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.



श्रीपूर येथे संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांना ब्रिमा सागर डिस्टलरीज कारखान्याच्या वतीने डायरेक्टर उदय कोठारी, मंदार आगाशे, भरतकुमार सेठिया, उद्योगपती घैसासी यांच्या हस्ते अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.

### यंदाच्या सोहळ्यात वारकऱ्यांच्या संख्येत वाढ

यंदा राज्यात सर्वत्र वेळेवर पाऊस पडत असल्यामुळे व पेरण्या वेळेत झाल्यामुळे या आषाढी वारीसाठी पायी चालणाऱ्या भक्तामध्ये मोठी वाढ झाली असून यंदा पालखी सोहळ्याबरोबर सुमारे तीन ते साडेतीन लाखाच्या आसपास भाविक आहेत. देहूमधून पालखी सोहळा सुखरूपणे सोलापूर जिल्ह्यात प्रवेश केला आहे. ढगाळ वातावरण असल्यामुळे भाविकांचा सुखकर प्रवास होत मुक्कामी ठिकाणी जात होते. या पालखीसोबत मानाच्या ३५९ दिंड्या आहेत, रथापुढील व मागील दिंड्यातील वारकरी खांद्यावर उंच पताका घेऊन एका सरळ रेषेत चाल करत असल्याने अतिशय सुंदर विलोभनीय भक्तिभावाचे दृश्य पहायला मिळाले.

---

# सन्मानाने आले तर महापालिका निवडणुकीत काँग्रेससोबत युती

**सोलापूर** : सोलापुरात एमआयएम पक्षाची पत्रकार परिषद घेत शहर अध्यक्ष तसेच राज्य कार्याध्यक्ष फारूक शाब्दी यांनी मोठे विधान केले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षा सोबत युती करणार का? या प्रश्नावर फारूक शाब्दी यांनी काँग्रेसवाले अगर सन्मानाने युती करण्यासाठी आमच्याकडे आले तर आम्ही जरुर युती करू आणि सोबत महापालिका निवडणूका लढू असे जाहीरपणे सांगितले आहे. त्यामुळे काँग्रेस नेते काय निर्णय घेतील याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

विधानसभा निवडणुकीत दोन वेळा नशीब आजमावणारे फारूक शाब्दी यांना पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष ओवेसी यांनी राज्य कार्याध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. दोनच दिवसांपूर्वी परभणी येथे झालेल्या सभेत फारूक शाब्दी याना मुंबई शहर अध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. फारूक शाब्दी यांच्याकडे सोलापूर शहर आणि मुंबई शहर अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. बुधवारी सायंकाळी एमआयएम पक्षातर्फे मुंबई आणि सोलापूर शहर अध्यक्ष फारूक शाब्दी यांच्या अध्यक्षतेखाली राहत कॉम्प्लेक्स या ठिकाणी पत्रकार परिषद घेण्यात आली.पत्रकार परिषदेत फारूक शाब्दी यांनी सोलापूर शहर कार्यकारिणी जाहीर केली.



# तीन दिवसाआड पाणीपुरवठा; महापालिका प्रशासनात समन्वयाचा अभाव

## ● ... तोपर्यंत तीन दिवसाआड पाणी अशक्य : आयुक्त
## ● कोणतीही अधिकृत माहिती आम्हाला दिली नाही : कारंजे

**सोलापूर** : शहराचा पाणीपुरवठा सुरळीत आणि नियमित करण्यासंदर्भात महापालिका प्रशासनात समन्वयाचा अभाव दिसत असून एकीकडे महापालिका सार्वजनिक आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे हे तीन दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला असल्याचे सांगतायत तर दुसरीकडे महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे अंतर्गत जलवाहिनी आणि पुरेशा पाण्याच्या टाक्याचे काम झाल्याशिवाय तीन दिवसाआड पाणीपुरवठा अशक्य असल्याचे स्पष्ट करतात. कोणतीही अधिकृत माहिती आम्हाला दिलेली नसल्याचे नियंत्रण अधिकारी संदीप कारंजे यांनी म्हटले आहे. यामुळे संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

सध्या सोलापूर शहरात चार आणि पाच दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो. काही ठिकाणी लोकांना आठवड्यात एकदाच पाणी मिळते. कधी वीज पुरवठा खंडित होतो तर कधी जलवाहिनीला गळती लागते. त्यामुळेदेखील पाणीपुरवठा विस्कळीत होतो. पुरेसे पाणी नाही, पाण्याला दाब नाही आणि वेळेवर पाणी नाही अशा तक्रारी सातत्याने सुरु आहेत.

सोलापूर ते उजनी समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण झाले. या जलवाहिनीची चाचणीदेखील यशस्वी झाली. १७० एमएलडी पाणी दररोज मिळणार असे महापालिकेकडून सांगण्यात आले. जवळपास आठशे कोटी रुपये खर्च करून समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण करण्यात आले. इतकी मोठी रक्कम खर्च झाल्यानंतर शहराला त्याचा किती फायदा झाला असा प्रश्न महापालिकेला कर भरणाऱ्या सामान्य नागरिकांच्या मनात आहे. महापालिका अधिकारी मात्र याचे थेट उत्तर देणे टाळत असल्याचे दिसते.

दोन दिवसापूर्वी महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे यांनी समांतर जलवाहिनीमुळे शहराच्या पाणीपुरवठ्यात एक दिवसाचा फरक पडेल असे सांगितले होते. जिथे चार दिवसाआड पाणीपुरवठा केला जातो तिथे तीन दिवसाआड पाणी मिळेल असे सांगून याबाबत एक जुलैपासून काही भागात प्रयोग यशस्वी झाल्याची माहितीही दिली. उर्वरित भागात पाच ऐवजी चार दिवसाआड पाणीपुरवठा केला जाईल हेदेखील चौबे यांनी स्पष्ट केले. पाणीपुरवठ्याचा एक दिवस कमी करताना वेळेत अर्धा तासाची कपात करण्यात येईल, असेही सार्वजनिक आरोग्य अभियंता यांनी म्हटले होते.

बुधवारी पत्रकार परिषदेत माहिती देताना महापालिका आयुक्त आणि इतर वरिष्ठ अधिकारी यांनी या विषयावर कानावर हात ठेवले. शहरातील अंतर्गत वितरण व्यवस्था जोपर्यंत पूर्ण होणार नाही तोपर्यंत पाण्याचे दिवस कमी होणार नाहीत, असे आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी स्पष्ट केले. व्यंकटेश चौबे यांनी दिलेली माहिती चुकीची आहे का असे विचारले तेव्हा ते त्यांनाच विचारा असेही आयुक्तांनी उत्तर दिले.



### आरोग्य अभियंता चौबे यांचा एकला चलो रे कारभार

पाणीपुरवठा विभागाचे नियंत्रण अधिकारी असलेले अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे म्हणाले, शहरातील काही भागात प्रायोगिक तत्त्वावर तीन दिवसाआड पाणीपुरवठा केला जात आहे अशी प्राथमिक माहिती आहे. परंतु या विभाग प्रमुखांनी याबाबतीत कोणतीही अधिकृत माहिती आम्हाला दिलेली नाही. चौबे कोणत्या आधारावर तीन दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन लोकांना देत आहेत याचीही कल्पना आम्हाला नाही, असेही कारंजे म्हणाले. यावरून आरोग्य अभियंता वेंकटेश चौबे हे नियंत्रण अधिकाऱ्यांशी समन्वय साधत नाहीत. त्यांचा कारभार एकला चलो रे सारखा होत असल्याचे दिसून येते.

---

# प्रेयसीने केली काचेने मारहाण; प्रियकर जखमी

**सोलापूर** : किरकोळ वादातून प्रेयसींने काचेच्या बाटलींने केलेल्या मारहाणीत प्रियकर जखमी झाला. ही घटना एमआयडीसी परिसरातील सत्यविजय मंगल कार्यालयाजवळ मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. तन्वीर फक्रुद्दीन नदाफ (वय ३५ रा.मुमताज नगर कुमठा नाका) असे जखमींचे नाव आहे. त्याला साजिद नदाफ (भाचा) यांनी उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल केले. काल मंगळवारी रात्री आठच्या सुमारास तन्वीर याचे त्याची प्रेयसी सोबत वाद झाला होता. त्यावेळी तिने रागाचे भरात काचेच्या बाटलींने मारहाण केली. त्यात डाव्या हाताला मार लागून तो जखमी झाला. अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

### आरळी येथे विष पिऊन आत्महत्या प्रयत्न

आरळी (ता.मंगळवेढा) येथे राहणाऱ्या दराप्पा कांतू भांजे (वय २८) या तरुणाने राहत्या घरात विष पिऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. मंगळवारी रात्री १० वाजेच्या सुमारात त्याने अज्ञात कारणावरून पिकावर फवारणीचे विषारी द्रव प्राशन केले होते. त्याला बोराळे येथे प्राथमिक उपचार करून सोलापूरातील शासकिय रुग्णालयात मित्राते दाखल केले. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

### शाळेतील मैदानात ब्लेडने मारहाण; विद्यार्थी जखमी

शाळेतील मैदानात क्रिकेट खेळण्याच्या कारणातून वाद झाला. त्यातून ब्लेडने केलेल्या मारहाणीत लकी संजय बसव (वय १० वर्षे) हा विद्यार्थी हातास मार लागून जखमी झाला.

ही घटना औसा मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथे मंगळवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्याला मंद्रूप येथे प्राथमिक उपचार करून वडिलांनी सोलापुरातील शासकिय रुग्णालयात दाखल केले. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

# सांगलीत मुळशी पॅटर्नची पुनरावृत्ती! घर आणि कारसाठी लाखोंची मागणी

## सोलापूरच्या माहेरवाशीणला दिला शारीरिक व मानसिक त्रास

**सोलापूर** : कार घेण्यासाठी आणि घर बांधण्यासाठी माहेरहून ०६ लाख रुपये घेऊन ये, असे म्हणत विवाहितेला शारीरिक आणि मानसिक त्रास देण्याची मुळशी पॅटर्न घटना सांगली येथे घडली आहे. स्वाती धनंजय भोसले, (वय-२४ वर्षे, रा घरनं २५४/५/१, जोशी गल्ली रविवार पेठ सोलापूर) असे फिर्यादीचे नाव असून या प्रकरणामध्ये आरोपी पती धनजंय, सासू मिनाक्षी, सासरे बळवंत, जाऊ काजल, नंणद मनिषा, नांदेचा पती विनोद सर्व रा. अस्वले कॉलनी एमआयडीसी मिरज जि. सांगली यांच्या विरोधात दि.१ जुलै रोजी जेलरोड पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली आहे.

फिर्यादी स्वाती भोसले ही दि.२७ फेब्रुवारी २०१९ ते आजतागायात पर्यंत सासरी नांदत असताना पती, सासू, सासरे, नंदा, यांनी स्वाती हिला वारंवार घालून पाडून बोलायचे तसेच किरकोळ कारणावरून भांडण करायचे.

तुझ्या माहेरहून संसार उपयोगी साहित्या आणण्यासाठी शारीरीक व मानसिक त्रास देणे सुरूच ठेवले होते. स्वातीच्या पतीला धनंजय याला दारूचे व्यसन जडले होते. तो सातत्याने दारू पिवून स्वतःच्या बायकोच्या चारित्र्यावर संशय घेवून मारहाण करत असे, यांसह घराच्या बांधकामासाठी ०१ लाख आणि चारचाकी कार घेण्यासाठी ०५ लाख असे एकूण ६ लाख रु. माहेरहून घेऊन ये असे सारखा तगादा लावायचे. नेमक्या याच कारणावरून आरोपींनी विवाहितेला शारीरिक आणि मानसिक छळ सुरूच ठेवले. या कौटुंबिक मारहाण केल्याप्रकरणी ३६८/२०२५ भा. न्याय संहिताकलम ८५,११५(२), ३५२.३(५) प्रमाणे जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोहेकों मस्के करत आहेत.

---

# सराईत गुन्हेगार ओंकार ऊर्फ नाईंट्या संतोष नलावडेची येरवड्यात रवानगी

**सोलापूर/प्रतिनिधी**

सोलापूर शहरातील सराईत गुन्हेगार ओंकार उर्फ नाईंट्या संतोष नलावडे (वय-२५ वर्षे, रा. सुंदराबाई डागा शाळेजवळ, बांध वस्ती, दमाणी नगर, सोलापूर) याची अखेर येरवड्यात रवानगी करण्यात आली आहे. फौजदार चावडी पोलीस ठाण्याच्या परिसरात सराईत गुन्हेगार ओंकार ऊर्फ नाईंट्या संतोष नलावडे, हा मागील काही वर्षांपासुन सातत्याने जिवघेण्या घातक शस्त्राने इच्छापुर्वक दुखापत करणे, खुनाचा प्रयत्न करणे, लोकसेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत किंवा जबर दुखापत पोचवणे, विनयभंग करणे, जबरी चोरी, खंडणी मागणे, धाक दाखवणे, दगडफेक करणे, घातक शस्त्रांनी धमकवणे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे सोलापुर शहरात दाखल आहेत.



ओंकार ऊर्फ नाईंट्या नलावडे यास त्याच्या गुन्हेगारी वृत्तीपासून परावृत्त करण्यासाठी प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. मात्र त्यानंतरही, ओंकार ऊर्फ नाईंट्या नलावडे, याच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही आणि त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा होईल असे गुन्हेगारी कृत्य चालु ठेवली.

त्यामुळे गुन्हेगारी कृत्यास वेळीच प्रतिबंध घाण्यासाठी पोलीस आयुक्त एम. राज कुमार यांनी, दि.०१ जुलै रोजी नलावडे याला येरवडा कारागृहात स्थानबद्ध करण्यात आले आहे.

# शिक्षक नेहमी समाज जागृतीचे काम करत असतो : शिंदे

**सोलापूर/प्रतिनिधी**

शिक्षक हा प्रशासकीय कामातून निवृत्त झाला तरी निवृत्तीनंतरही समाज जागृतीचे काम करीतच असतो, असे प्रतिपादन माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी केले.

निर्मलकुमार फडकुले सभागृहात सातलिंग शटगार यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संगमेश्वर कॉलेजचे माजी प्राचार्य नरेश बदनोरे होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक माजी गटशिक्षणाधिकारी अशोक भांजे यांनी केले.

यावेळी व्यासपीठावर माजी आमदार विश्वनाथ चाकोते, शहराध्यक्ष चेतन नरोटे, माजी जिल्हाध्यक्ष प्रकाश पाटील , माजी महापौर अलका राठोड, सुशीला आबुटे, संजय हेमगड्डी, पुरुषोत्तम बलदवा, प्राध्यापक भीमाशंकर बिराजदार, जिल्हा वरिष्ठ उपाध्यक्ष अशपाक बळोरगी, अक्कलकोटच्या माजी नगराध्यक्ष सुवर्णा मलगोंडा, रवीकिरण शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव श्रीपाद सुरवसे, जिल्हा उपाध्यक्ष अरुण जाधव, सतीश दरेकर आदी उपस्थित होते.

यावेळी शिंदे पुढे म्हणाले, सातलिंग शटगार यांनी शिक्षकी पेशाबरोबर अंधश्रद्धा निर्मुलन कार्याच्या माध्यमातून विद्यार्थी, पालक व समाजामध्ये जनजागृतीचे व वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्याचे काम त्यांनी अतिशय चांगल्या पद्धतीने केले आहे. त्यांनी एवढेच नव्हे वेगवेगळ्या क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय असून शटगार सर म्हणजे एक चिंतनशील व्यक्तिमत्व आहे.

याप्रसंगी सातलिंग शटगार यांना शिकवलेल्या गुरुजनांचा सन्मान माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. दत्तप्रशाला येथून ३५ वर्षे सेवा करून सेवानिवृत्त होत असल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार घालून सातलिंग शटगार यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी सातलिंग शटगार यांनी आपल्या जीवनाचा प्रवास सांगून जीवनाच्या सुखदुःखामध्ये त्यांना मदत केलेल्या सर्व मान्यवरांचे त्यांनी आभार मानले. आभार राजश्री तडकासे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अशोक भांजे, डॉ. मंगेश शहा, सोमशेखर भोगडे, विजयकुमार भोगडे, चंद्रकांत सपळे, शिवबाळ मुली, जहांगीर शेख, बाळ दळवी, श्रीदेवी यळमेली, नर्मदा कनकी, रोहित




सेवानिवृत्तीनिमित्त सातलिंग शटगार यांचा सत्कार करताना सुशीलकुमार शिंदे.

# वडाळा गाव बनतेय हायटेक व्हिलेज

जिल्ह्याचे लोकनेते बळीरामकाका साठे यांचा गेली सहा दशकांपासून वडाळा गावाच्या विकासाचा यज्ञ सुरु आहे. चार वर्षांपूर्वी जितेंद्रबाबा साठे यांची सरपंच म्हणून नियुक्ती झाली. तेव्हापासून कोट्यवधी रुपयांची विकासकामे करुन त्यांनी वडाळा गावचा चेहरा-मोहरा बदलून टाकण्याची किमया केली आहे. आज वडाळा गाव हायटेक व्हिलेज बनत आहे.

मागील वर्षभरातील त्यांच्या विकासकामांकडे दृष्टीक्षेप टाकला असता तब्बल सात कोटी रुपयांची विकासकामे मंजूर झाली आहेत. सोलापूर जिल्ह्यातच नाही तर राज्यात वडाळा गावासारखी हायटेक स्मशानभूमी कुठेच पहायला मिळत नाही. हे मोठे काम जिर्तेंद्रबाबांच्या कार्यकाळातच झाले. इथे गेल्यावर्षी २० लाख रुपये खर्चून निवारा शेड उभारण्यात आला आहे. रमाई आवास योजना व प्रधानमंत्री ग्रामीण आवास योजनेतून ८० घरांना मंजुरी आणली त्यासाठी ७० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे.

ग्रामदैवत श्री शेखफरींदबाबा देवस्थानला ब वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा मिळाला असून पाच कोटी रुपयांचा विकास निधी मंजूर झाला आहे. वडाळा गावातील आठवडा बाजार काँक्रीटीकरण, दिवाबत्ती, स्वच्छतागृह यासाठी २५ लाख रुपये खर्च झाले आहेत. वडाळा ते शेखफरींदबाबा वडगाव या रस्त्यासाठी ४० लाख रुपये, वडाळा वांगी रस्त्यासाठी २० लाख रुपये ही मागील एक वर्षातील कामे आहेत.



वडाळा-सोलापूर रस्त्यावर गावात आधुनिक पथ दिवे बसविण्यात आले आहेत. इचकेच नाही तर शिक्षण संकुल आणि उद्योगधंद्यांचे जाळे यामुळे गावात येणाऱ्या लोकांची वर्दळ वाढली आहे. त्यामुळे वडाळा गावातील एस.टी.स्टँन्ड परिसरात छत्रपती शिवाजी महाराज चौकात सी.सी.टी.व्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. वडिलांमुळे त्यांना राजकीय वारसा मिळाला. काकांच्या मार्गदर्शनाखाली वडाळा गावात विकासकामांचा डोंगर उभा राहिला आहे. वडाळा हे गाव खेडेगाव राहिले नसून ते हायटेक व्हिलेज झाले आहे. असे असताना देखील कोणताही बडेजावपणा न करता सर्वांना विश्वासात घेऊन ते कारभार हाकत आहेत. श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठीही त्यांची आग्रही भूमिका आहे. कुटुंबाला वडिलांचा राजकीय वारसा लाभून देखील कोणताही बडेजावपणा न करता सामान्य कार्यकर्त्यांमध्ये मिसळून प्रत्येकाला आपुलकीने वागविणारे वडाळा गावचे सरपंच जितेंद्रबाबा साठे म्हणजे दोस्तीच्या दुनियेतील राजाच आहेत.

**-दत्तात्रय मोकाशी, वडाळा**